# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** अक्कलकुवा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0365 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/10/2025 03:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 28/10/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/10/2025
**Time From (वेळेपासून):** 17:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/10/2025 **Time (वेळ):** 03:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/10/2025 03:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अक्कलकुवा पोलीस स्टेशन ,अक्कलकुवा पोलीस स्टेशन

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पद्मावती मधुसदन कलाल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे , अक्कलकुवा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे , अक्कलकुवा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9923937322

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शैलेश विजयसिंग गावीत | | | 1. दुधाळे शिवार कोकणी हिल, नंदुरबार,नंदुरबार,अक्कलकुवा, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दि.28.10.2025 रोजी 3,000 | 2,000.00 |

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| | | | / रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 2,500/ रुपये लाचेची रक्कम स्विकारण्या | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पद्मावती मधुसदन कलाल, वय 42 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देते की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे तीन महिन्यांपासुन कार्यरत आहे. दि.28.10.2025 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी तक्रारदार हारुण शेख अली यांनी त्यांच्याकडे अक्कलकुवा येथील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची माहिती दुरध्वनीद्वारे कळविल्याचे सांगुन आम्हास अक्कलकुवा, जि. नंदुरबार येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन पुढील कार्यवाही करण्यास आदेशित केले. त्याप्रमाणे आम्ही उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग क्र.42, धुळे येथील दोन शासकिय कर्मचारी प्रभाकर विलास पाटील, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक व चेतन प्रकाश पाटील, कनिष्ठ अभियंता यांना उपलब्ध करुन घेवुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकिय वाहन क्र. एम.एच.18 बीएक्स 0221 ने रवाना होवुन अक्कलकुवा शहरातील साईखुशी हॉटेलच्या समोरील तक्रारदार यांच्या अली गॅरेजवर पोहोचलो. तेथे आम्हास ठरल्याप्रमाणे तक्रारदार हे भेटले. तेव्हा त्यांनी आम्हास पंचांसमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकिगत सांगितली. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना लिहीता येत नसल्यांने त्यांच्या सांगण्याप्रमाणे पंच श्री प्रभाकर पाटील यांचे हस्ते तक्रारदार यांची तक्रार लिहुन घेतली ती पुढील प्रमाणे ''विनंतीपुर्वक तक्रारी अर्ज देतो की, माझा लहान भाऊ रईस शेख अली याचेविरुध्द रिजवाना फारुख खान यांनी दि.01.10.2025 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन अक्कलकुवा पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार शैलेश गावित यांनी एनसी केस दाखल केली असुन सदर एनसी केसची चौकशी पोलीस हवालदार महेंद्र जाधव यांच्याकडे आहे. एनसी केस दाखल केल्यानंतर पोलीस हवालदार शैलेश गावित व महेंद्र जाधव यांनी माझयाकडुन माझया भावावर चॅप्टर केस न करण्यासाठी 3,000/- रुपये घेतले आहेत. त्यानंतर मी दि.26.10.2025 रोजी अक्कलकुवा पोलीस स्टेशनजवळुन जात असतांना माझी पोलीस हवालदार शैलेश गावित यांचेशी भेट झाली. तेव्हा त्यांनी मला ''तु फक्त 3,000/- रुपये दिलेले आहेत, तुला अजुन 3,000/- रुपये दयावे लागतील, पैसे दिले नाही तर तुझया भावावर चॅप्टर केस दाखल करुन त्याला अटक करतो'' असे सांगितले होते. त्यावेळी मी त्यांना आता माझयाकडे पैसे नाहीत, पैसे जमा झाल्यावर देण्यास येतो असे सांगितले आहे.

मी शैलेश गावित यांना आज दि.28.10.2025 रोजी त्यांना भेटण्यास अक्कलकुवा पोलीस स्टेशन येथे जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी हि विनंती आहे.'' सदरची तक्रार आम्ही तक्रारदार यांना पंचांसमक्ष वाचुन दाखविल्यावर त्यावर तक्रारदार यांनी सही केली. त्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.

तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचांना सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना पोलीस हवालदार शैलेश गावित यांची अक्कलकुवा पोलीस स्टेशन येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे अली गॅरेजवरुन दुचाकी क्रमांक एम.एच. 39 एपी 7155 ने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच प्रभाकर पाटील असे पोलीस हवालदार शैलेश गावित यांची भेट घेवुन आमचे जवळ परत आले. तेव्हा तक्रारदार व पंच नं. 01 पाटील यांनी पोलीस हवालदार शैलेश गावित व तक्रारदार यांचेत अक्कलकुवा

पोलीस स्टेशनचे आवारात भेट होवुन तक्रारदार यांच्या भावाविरुध्द दाखल झालेल्या केसबाबत चर्चा झाली. तेव्हा पोलीस हवालदार शैलेश गावित यांनी तक्रारदार यांच्याकडे 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 2,500/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितल्याची हकिगत कथन केली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित झालेले पोलीस हवालदार शैलेश गावित व तक्रारदार यांचेतील संभाषण ऐकुन पोलीस हवालदार शैलेश गावित यांनी लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने आम्ही पोलीस हवालदार शैलेश गावित याचेवर सापळा लावण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर आम्ही सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्याकडे पोलीस हवालदार शैलेश गावित यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना देण्याकरीता त्यांच्याकडे फक्त 2,000/- रुपये असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना गावित यांना 2,000/- रुपये लाचेची रक्कम दयावी, त्यांनी 2,500/- रुपयांची मागणी केल्यास त्यांना 500/- रुपये नंतर आणुन देतो असे सांगावे, असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्याकडुन 500/- रुपये दराच्या 04 नोटा असे एकुण 2,000/- रुपये सापळाकामी घेवुन सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पठाणी शर्टाच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 पाटील यांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन त्यांना तक्रारदार यांच्या कार क्र. जीजे 05 जेयु 9056 ने अक्कलकुवा पोलीस स्टेशन येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही शासकिय वाहनाने जावुन अक्कलकुवा पोलीस स्टेशन परिसराच्या आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी पोलीस स्टेशन इमारतीचे बाहेरील आवारातुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने पोलीस हवालदार शैलेश गावित यांना ताब्यात घेतले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 चेतन पाटील यांनी पोलीस हवालदार शैलेश गावित यांच्या हातातील 2,000/- रुपये लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर अक्कलकुवा पोलीस स्टेशन येथे आवश्यक ती कार्यवाही करुन ला.प्र.वि. नंदुरबार कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशाप्रकारे लोकसेवक शैलेश विजयसिंग गावित, पोलीस हवालदार, अक्कलकुवा पोलीस स्टेशन यांनी तक्रारदार हारुण शेख अली यांच्या लहान भावाविरुध्द दाखल झालेल्या एनसी केसमध्ये प्रतिबंधात्मक कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडुन दि.28.10.2025 रोजी 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 2,500/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन तक्रारदार यांच्याकडुन 2,000/- रुपये लाचेची रक्कम अक्कलकुवा पोलीस स्टेशनचे इमारतीचे बाहेरील आवारात 19:34 वाजता स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Sarang Vasudevrao Navalkar(I (Inspector)) / PQBN63756 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Sarang Vasudevrao
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN63756

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)